TODAY
परभणी

सकाळ
नांदेड, सोमवार, १९ डिसेंबर २०१६
४

## शेतकरी मेळाव्यात पिकांवर मार्गदर्शन

सेलू, ता. १८ : नूतन महाविद्यालय, श्री. जिवाजी महाराज ॲग्रो कंपनी चिकलठाणा (बु.) व तालुका कृषी विभागातर्फे सोमवारी (ता. १२) शेतकरी मेळावा घेण्यात आला. या प्रसंगी कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी मधुकर घुगे, दत्तराव पावडे, एस. के. गाडगे, एस. डी. वरूर, डी. डी. कुलकर्णी, प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी, प्रा. डॉ. पटाईत, पी. एफ. कोटेचा, प्रा. डॉ. व्ही. एच. पांचाळ आदींची उपस्थिती होती.

प्रास्ताविक प्राचार्य डॉ. शरद कुलकर्णी यांनी केले. या वेळी भास्करराव वीर यांच्या पाल्याने नागपूर येथील एकलव्य सामान्य ज्ञान स्पर्धेत यश संपादन केल्याबद्दल उपस्थितांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या शेकरी मेळाव्याला तालुक्यातील दोनशे शेतकरी सहभागी होते. मेळावासाठी प्रा. डॉ. वसंत पांचाळ, प्रा. डॉ. पी. आर. कंठाळे, प्रा. दयानंद जामगे, प्रा. डी. बी. गायकवाड, प्रा. ए. टी. मदने, प्रा. यू. के. हेसे आदींनी पुढाकार घेतला. सूत्रसंचालन व आभार पी. एफ. कोटेचा यांनी केले. मेळाव्याला शेतकऱ्यांची उपस्थिती होती.